**ठळक बातम्या**

- भारताचा सागरी दृष्टिकोन हा सुरक्षितता, स्थैर्य आणि आत्मनिर्भरतेवर आधारित असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन, मुंबईत इंडिया मेरिटाईम वीक परिषदेचं उद्घाटन

- भारताची संरक्षण निर्यात २३ हजार ५०० कोटी रुपयांच्या विक्रमी स्तरावर पोहोचल्याची संरक्षण मंत्र्यांची माहिती

- मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीत महायुतीतले घटक पक्ष एकत्रित निवडणूक लढतील, असा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांना विश्वास

**आणि**

- आंतरराष्ट्रीय सौर आघाडी सभेच्या आठव्या अधिवेशनाला आजपासून नवी दिल्लीत सुरुवात

**<><><><><>**

भारताचा सागरी दृष्टिकोन हा सुरक्षितता, स्थैर्य आणि आत्मनिर्भरतेवर आधारित असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. शहा यांच्या हस्ते आज मुंबईत इंडिया मेरिटाईम वीक या परिषदेचं उद्घाटन झालं, तेव्हा ते बोलत होते. अलिकडच्या काळात करण्यात आलेल्या व्यापक संरक्षणात्मक सुधारणांमुळे भारत एक मजबूत सागरी शक्ती म्हणून उदयाला येत असल्याचंही शहा म्हणाले. गेट वे ऑफ इंडिया सारख्या ऐतिहासिक वास्तू लाभलेल्या ठिकाणी होणाऱ्या मेरिटाईम वीक या परिषदेत गेट वे ऑफ वर्ल्ड दृष्टिकोनाविषयी विचारमंथन होणार असल्याचं ते म्हणाले. सागरमाला योजनेविषयी शहा म्हणाले..

**होल्ड बाईट - अमित शहा**

इंडिया मेरिटाईम वीक हा जगातल्या सर्वात प्रमुख सागरी मेळाव्यापैकी एक झाला असून त्यात ८५ देशांनी सहभाग घेतल्याचं केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यावळी म्हणाले. या परिषदेची यंदाची संकल्पना एकत्रित महासागर, एक सागरी दृष्टीकोन अशी असल्याचंही ते म्हणाले. तर महाराष्ट्रातलं वाढवण हे बंदर जगातल्या सर्वोत्तम दहा बंदरांपैकी एक असेल, त्यामुळे भारताची सागरी शक्ती आणखी मजबूत होईल, असं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले.

मुंबईत माझगाव गोदीत खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठीच्या दोन नौकांचं लोकार्पणही शहा यांच्या हस्ते झालं. या नौकांची चावी आणि नोंदणी प्रमाणपत्रही यावेळी लाभार्थ्यांना वितरित करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह शहा यांनी या नौकांची पाहणी केली. या नौकांमुळे मासेमारांना खोल समुद्रात जाऊन टूनासारखे मासे पकडणं शक्य होणार आहे.

या सोहळ्याला गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण मांझी, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल उपस्थित होते.

**<><><><><>**

भारताची संरक्षण निर्यात आता २३ हजार ५०० कोटी रुपयांच्या विक्रमी स्तरावर पोहोचल्याची माहिती संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी दिली आहे. नवी दिल्ली इथं झालेल्या एसआयडीएम वार्षिक परिषदेला ते आज संबोधित करत होते. गेल्या दशकात देशांतर्गत संरक्षण उत्पादन १ लाख ५० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त वाढलं आहे. नाविन्य, संरचना आणि उत्पादन अशा तिन्ही बाबींवर भर दिल्याने ऑपरेशन सिंदूर यशस्वी ठरलं. स्वदेश निर्मित शस्त्रांस्त्रांमुळे भारताची प्रतिष्ठा आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढल्याचंही सिंग यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

मलेशियातील क्वालालंपूर इथं २० व्या पूर्व आशिया शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी आज न्यूझिलंडचे प्रधानमंत्री क्रिस्तोफर लक्सन यांची भेट घेतली. भारत आणि न्यूझिलंड दरम्यानचं द्विपक्षीय सहकार्य वाढवण्याबाबतच्या लक्सन यांच्या वचनबद्धतेचं जयशंकर यांनी कौतुक केलं तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वतीने लक्सन यांना शुभेच्छा दिल्या. जयशंकर यांनी अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मार्क रुबियो यांचीही भेट घेतली.

परराष्ट्र व्यवहार मंत्री जयशंकर या परिषदेत भारताचं प्रतिनिधित्व करणार आहेत. या शिखर परिषदेत इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील शांतता, स्थिरता आणि समृद्धीसमोरील आव्हानांवर तसंच प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींवर विचार विनिमय करण्यात येणार आहे.

<><><><>

मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीत महायुतीची एकजूट भक्कम राहिल, असं केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले. ते आज नागपूर इथं बोलत होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमुळे महाविकास आघाडीत फूट पडली असून त्यामुळे मतं विभागली जातील, अशी शक्यताही आठवले यांनी व्यक्त केली आहे. महापालिकेची निवडणूक ही महायुती जिंकेल या भीतीपोटी महाविकास आघाडी निवडणूक आयोगावर नाहक आरोप करत असल्याचंही आठवले यावेळी म्हणाले.

<><><><>

नागपूरमध्ये उद्या राज्यभरातील शेतकरी संघटना महाएल्गार आंदोलन करणार आहेत. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, शेतमालाला हमीभाव, दिव्यांगांना ६ हजार रुपये मानधन, तसंच मेंढपाळ आणि मच्छीमारांच्या हक्कांसाठी हे आंदोलन केलं जाणार असल्याचं प्रहार पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी सांगितलं. जेष्ठ शेतकरी नेते विजय जावंधिया, राजू शेट्टी, डॉक्टर अजित नवले, राजन क्षीरसागर, महादेव

जानकर, वामनराव चटप यांच्यासह अनेक नेते या आंदोलनात सहभागी होणार आहेत.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय सौर आघाडी सभेचं आठवं अधिवेशन आज नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं सुरू होत आहे. या चार दिवसीय कार्यक्रमात १२४ देश सहभागी होत असून जगभरातील ४० हून अधिक मंत्री उपस्थित राहतील. जागतिक समुदायाने उज्ज्वल आणि शाश्वत भविष्यासाठी सौर ऊर्जा स्वीकारण्यासाठी हा कार्यक्रम महत्वाची भूमिका बजावेल. भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा सौर ऊर्जा उत्पादक देश आहे तसंच अक्षयऊर्जा वाढीसाठी जगातली दुसरी सर्वात मोठी बाजारपेठ आहे. प्रधानमंत्री सूर्य घर मोफत योजनेअंतर्गत देशातील २० लाखांहून अधिक कुटुंबांनी सौर ऊर्जेचा लाभ घेतला आहे.

<><><><><>

राज्यातले खेळाडू आपल्या क्रीडा कौशल्यात अधिक पारंगत व्हावेत यासाठी सरकार त्यांना तज्ञ प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक आणि इतर पायाभूत सुविधा व्यापक प्रमाणात उपलब्ध करुन देत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नागपूरमध्ये आयोजित ७५व्या राज्य बास्केटबॉल स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार व्हावेत या दृष्टीनं क्रीडा विभागानं एक व्यापक धोरण आपण अंगिकारल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी पुढील सरन्यायाधीश पदासाठी न्यायमूर्ती सुर्यकांत यांच्या नावाची शिफारस केली आहे. सरन्यायाधीश गवई येत्या २३ नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त होत असून त्यानंतर न्यायमूर्ती सुर्यकांत हे सरन्यायाधीशपदाची सूत्रं स्वीकारतील. या शिफारशीनंतर

केंद्र सरकार त्यांच्या नावाची अधिसूचना जारी करेल. त्यानंतर न्यायमूर्ती सुर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीशपदाची शपथ घेतील. न्यायमूर्ती सुर्यकांत यांना १४ महिन्यांचा कालावधी मिळणार असून ते ९ फेब्रुवारी २०२७ रोजी सेवानिवृत्त होणार आहेत.

<><><><><>

सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा वाढवण्यासाठी आणि भ्रष्टाचारमुक्त समाजाचं ध्येय साध्य करण्यासाठी आजपासून देशभरात दक्षता जागरूकता सप्ताह २०२५ साजरा केला जात आहे. ‘दक्षता - आपली सामुहिक जबाबदारी,’ ही यंदाच्या जागरुकता सप्ताहाची संकल्पना आहे. विविध मंत्रालये, विभाग, सार्वजनिक उपक्रम, बँका, सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयात आज प्रतिज्ञा घेऊन सप्ताहाची सुरुवात झाली. केंद्रीय दक्षता आयुक्त प्रवीण कुमार श्रीवास्तव आणि दक्षता आयुक्त ए. एस. राजीव यांनी आज नवी दिल्ली इथं केंद्रीय दक्षता आयोगाच्या अधिकाऱ्यांना शपथ दिली.

<><><><><>

रायगड जिल्ह्यातील माथेरानची राणी ही मिनी ट्रेन १ नोव्हेंबर पासून सुरू होत आहे. जून ते ऑक्टोबर या काळात ही मिनी ट्रेन बंद होती. पावसानंतर रेल्वेमार्गाची दुरुस्ती आणि अन्य तांत्रिक बाबी पूर्ण झाल्यानंतर मिनी ट्रेन पर्यटकांना निसर्गाचा आनंद देण्यासठी सज्ज झाली असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

<><><><><>

नंदुरबार बस स्थानकासाठी देण्यात आलेल्या १० इलेक्ट्रिक वातानुकूलित बसचं आमदार विजयकुमार गावित यांच्या हस्ते आज लोकार्पण झालं. या बस स्थानकात गेल्या पाच-सहा महिन्यांपासून सुरु असलेलं ईलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशनचं काम पूर्ण झालं असून इलेक्ट्रिक बस चार्जिंगची सोयही उपलब्ध झाली आहे. या

बस धुळे, नाशिक, पुणे, मुंबई  मार्गावर धावणार असून या एसी बसगाड्यांमुळे प्रवाशांचा प्रवास आरामदायी होणार आहे.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या नवापूर तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेल्या अवकाळी पावसाने पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. जामनझर परिसरात कापणी करून ठेवलेल्या भात पिकाचं नुकसान झालं आहे. तसंच सोयाबीन, तूर, मका पिकाला देखील मोठा फटका बसल्यानं सरकारनं तातडीनं पंचनामे करुन नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी जिल्ह्यातील नुकसान नुकसानग्रस्त शेतकरी करत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेत काल नवी मुंबईतील भारत-बांग्लादेश दरम्यानचा सामना पावसामुळं अखेर अनिर्णित राहिला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या बांग्लादेशनं मर्यादित २७ षटकांमध्ये ९ बाद ११९ धावा केल्या. भारतीय महिलांनी नाबाद ५७ धावांपर्यंत मजल मारली असताना पाऊस थांबण्याचं चिन्ह नव्हतं, त्यामुळं सामना अनिर्णित ठेवावा लागला.

**//<><><><><>//**